# नियमित दिवाणी दावा क्रमांक १३४/२०२१ मधील निशाणी ०५ व निशाणी १९ प्रमाणे आदेश

(दिनांक ०८/०२/२०२२)

प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादी विरुद्ध निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीने निशाणी ०५ द्वारे प्रतिवादींच्या विरुध्द निरंतर ताकीदीची मागणी केलेली आहे. त्यामध्ये त्याचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ हे सख्खे भाऊ असून प्रतिवादी नं. ३ हे त्यांचे वडील आहेत. गट नं. ३८८ ही दावा मिळकत वादीची प्रत्यक्ष कब्जेवहीवाटीची असून तिच्या ७/१२ सदरी वादीचे नाव आहे. वादी हे सन २०१५ मध्ये सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी दावा मिळकतीमध्ये २ बोअर पाडले असून त्यांनी सिंचनाची सोय करुन दावा मिळकतीची प्रतवारी सुधारली आहे. वादी हे दावा मिळतीमध्ये ऊस या नगदी पीक घेत आहेत. त्यामुळे वादीची आर्थिक सुधारणा झाल्याने प्रतिवादींच्या मनात वादींविषयी द्वेष व मत्सर निर्माण झाल्याने प्रतिवादी हे वादीच्या दावा मिळकतीवरील शांततामय कब्जे वहीवाटीस हरकत अडथळा करीत असून वादीच्या पिकाचे नुकसान करणे, टी फोडणे, अपरात्री वीज कनेक्शनची वायर तोडणे, हद्दी खुणांचे दगड व बांध नष्ट करणे अशा प्रकारे हरकत करीत आहेत. प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी काही एक संबंध नाही. प्रतिवादी हे आडदांड असून त्यांचे आर्थिक व मनुष्यबळ फार मोठे आहे. प्रतिवादींचे असे कृत्य चालू राहिल्यास वादीस दावा मिळकतीचा उपभोग घेणे अशक्य होणार आहे व वादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे.

३. वादीने प्रतिवादींच्या गैरकृत्याबाबत दिनांक २३/०६/२०२० रोजी सायंकाळी ०७.०० वाजण्याच्या सुमारास प्रतिवादींना विचारणा केली असता प्रतिवादींनी वादीस शिवीगाळी करुन काठीने मारहाण केली आहे. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली आहे. सदर घटनेबाबत वादी तक्रार देण्यासाठी वैराग पोलीस स्टेशनला गेले असता पोलीसांनी तक्रार नोंदवून घेण्यास टाळाटाळ केली आहे. त्यामुळे वादीने दिनांक २४/०६/२०२० रजिस्टर पोस्टाने वैराग पोलीस स्टेशन, डी.वाय.एस.पी. बार्शी, पोलीस अधिक्षक, पोलीस महानिरीक्षक, तहसिलदार बार्शी व जिल्हाधीकारी यांचेकडे तक्रारी अर्ज पाठविलेला आहे. पोलींसानी कलम १४९ नुसार प्रतिवादी यांना नोटीस दिली परंतु पुढे

कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यानंतर दिनांक १८/०८/२०२० रोजी ११.०० वाजणेसे सुमारास प्रतिवादी क्र. १ व ३ हे वादीच्या घरी आले व तुझ्या गट नं. ३८८ मधील ऊस तोडूण नेणार आहे व सदर रानात कांदा लावणार आहे अशी धमकी दिली. प्रतिवादी क्र. १ व ३ यांना वादी यांनी वकीलांमार्फत रजिस्टर पोस्टाने दिनांक १९/०८/२०२० रोजी नोटीस पाठविली असता, सदर नोटीशीस प्रतिवादी यांनी उत्तर दिलेले असून त्यामध्ये त्यांनी गट नं. ३८८ शी प्रतिवादी यांचा काही एक संबंध नसल्याचे मान्य केले आहे. प्रतिवादी हे वादीच्या उसावर कब्जा घालण्याचा प्रयत्न करीत आहेत. वादीस सकृत दर्शनी केस असून न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी स्वतः अगर इतरांमार्फत दावा मिळकतीतील वादीचे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये. दावा मिळकतीत अतिक्रमण करु नये, वादीचा कब्जा जाईल असे कोणतेही कृत्य करु नये असा तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे विरुध्द व्हावा अशी विनंती केली आहे.

४. सदर अर्जास प्रतिवादी यांनी निशाणी २१ वर त्यांचे म्हणणे व प्रतिदावा दाखल केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी, गट नं. ३८५ ही मिळकत प्रतिवादींची वडिलोपार्जित मिळकत असून मिळकतीच्या हक्कपत्रकी महादेव मोरे व दत्तात्रय मोरे यांचे नावांची नोंद आहे. सदर मिळकत ही प्रतिवादी वहिवाटत असून ती त्यांच्या मालकी हक्काची मिळकत आहे. वादी हे प्रतिवादी क्र. ३ चे चुलत भाऊ आहेत. प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार व इतर यांच्या मौजे नांदणी येथे ब–याच ठिकाणी वडीलोपार्जित मिळकती होत्या. त्या मिळकतींपैकी कांही मिळकती हिंगणी तलाव जलाशयाकरीता महाराष्ट्र शासनाने संपादित करुन वर नमूद मिळकत व इतर मिळकती वारसा हक्काने प्रतिवादींचे कब्जे वहिवाटीत आहेत. सदर जमिनींवर प्रतिवादी व त्यांचे पुर्वहक्कदार यांची वहिवाट असताना वादी हा प्रतिवादींचे वहीवाटीस दिनांक १५/०७/२०२० पासून हरकत अडथळा करु लागले आहेत. प्रतिवादी यांनी सदर मिळकतीमध्ये ऊस पिक घेतलेले असताना सदरचे पीक तुम्ही काढू नका अशी उलट धमकी वादी व त्यांचे कुटूंबीय देत आहेत. प्रतिवादींना सदर मिळकतीतून हुसकावण्याचा व त्यांच्या शांततामय कब्जेवहीवाटीस हरकत अडथळा करण्याचा प्रयत्न वादी करीत आहेत. वादी यांचे कुटूंबातील सदस्य व मनुष्यबळ जास्त असल्याने मनगटशाही व दमदाटी करुन वादी यांनी प्रतिवादींचे वर नमूद मिळतीतील ऊस हे पिक शेतातून घेऊन जाऊ देणार नाही अशी धमकी दिली आहे. वादी यांनी प्रतिवादी

यांना वेळोवेळी खोट्या आशयाच्या नोटीसा पाठविलेल्या आहेत. प्रतिवादी यांना मानसिक त्रास देऊन नोटीसीद्वारे खोटी कागदपत्रे तयार करुन प्रतिवादींचे मिळकतीमध्ये बेकायदेशीरपणे कब्जा करण्याचा वादी व त्यांच्या कुटूंबीयांचा मानस आहे. प्रतिवादी यांनी वादीच्या नोटीसीस त्यांच्या वकीलांमार्फत उत्तर पाठवलेले असून त्यामध्ये संबंधीत गटाच्या चतुःसिमा दर्शविणारा गट नकाशाची उपविभागीय भुमी अभिलेख बार्शी यांची प्रत सोबत जोडली होती. त्यामुळे वादी व त्यांचे कुटूंबीयांनी दिनांक १५/०७/२०२० पासून प्रतिवादींचे गट नं. ३८५ या मिळकतीतील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु लागले आहेत. त्यामुळे वादींनी प्रतिवादींच्या गट नं. ३८५ या मिळकतीतील शांततामय कब्जे वहिवाटीस स्वतः अथवा इतरांमार्फत हरकत अडथळा करु नये असा निरंतर मनाई आदेश मिळावा व वादीचा तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

५. प्रतिवादीने निशाणी १९ वर तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज दाखल केलेला असून त्यामध्ये प्रतिदावा कलम १२ मध्ये वर्णन केलेली मिळकत गट नं. ३८५ ही मिळकत प्रतिवादींची वडिलोपार्जित मिळकत असून मिळकतीच्या हक्कपत्रकी महादेव मोरे व दत्तात्रय मोरे यांचे नावांची नोंद आहे. सदर मिळकत ही प्रतिवादी वहिवाटत असून ती त्यांच्या मालकी हक्काची मिळकत आहे. वादी हे प्रतिवादी क्र. ३ चे चुलत भाऊ आहेत. प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार व इतर यांच्या मौजे नांदणी येथे ब–याच ठिकाणी वडीलोपार्जित मिळकती होत्या. त्या मिळकतींपैकी कांही मिळकती हिंगणी तलाव जलाशयाकरीता महाराष्ट्र शासनाने संपादिल करुन वर नमूद मिळकत व इतर मिळकती वारसा हक्काने प्रतिवादींचे कब्जे वहिवाटीत आहेत. सदर जमिनींवर प्रतिवादी व त्यांचे पुर्वहक्कदार यांची वहिवाट असताना वादी हा प्रतिवादींचे वहीवाटीस दिनांक १५/०७/२०२० पासून हरकत अडथळा करु लागले आहेत. प्रतिवादी यांनी सदर मिळकतींमध्ये ऊस पिक घेतलेले असताना सदरचे पीक तुम्ही काढू नका अशी उलट धमकी वादी व त्यांचे कुटूंबीय देत आहेत. प्रतिवादींना सदर मिळकतीतून हुसकावण्याचा व त्यांच्या शांततामय कब्जेवहीवाटीस हरकत अडथळा करण्याचा प्रयत्न वादी करीत आहेत. वादी यांचे कुटूंबातील सदस्य व मनुष्यबळ जास्त असल्याने मनगटशाही व दमदाटी करुन वादी यांनी प्रतिवादींचे वर नमूद मिळतीतील ऊस हे पीक शेतातून घेऊन जाऊ देणार

नाही अशी धमकी दिली आहे. वादी यांनी प्रतिवादी यांना वेळोवेळी खोट्या आशयाच्या नोटीसा पाठविलेल्या आहेत. प्रतिवादी यांना मानसिक त्रास देऊन नोटीसीद्वारे खोटी कागदपत्रे तयार करुन प्रतिवादींचे मिळकतीमध्ये बेकायदेशीरपणे कब्जा करण्याचा वादी व त्यांच्या कुटूंबीयांचा मानस आहे. वादींचे वर नमूद कृत्य चालू राहिल्यास प्रतिवादींचे अतोनात कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. प्रतिवादींना सकृत दर्शनी केस आहे. त्यामुळे दावा व प्रतिदावा यांचा अंतिम निकाल लागेपावेतो वादीने स्वतः अथवा इतरांमार्फत प्रतिवादींचे प्रतिदावा कलम १२ मधील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये असा तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश वादी विरुध्द पारीत करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

६. वादीने प्रतिवादीच्या प्रतिदाव्यास व तुर्तातुर्त अर्जास म्हणणे निशाणी २४ वर दिलेले असून सदर म्हणण्यामध्ये प्रतिवादीच्या तुर्तातुर्त ताकीदीच्या अर्जामधील संपूर्ण मजकूर नाकारला आहे व त्यांनी कधीही हरकत अडथळा व दमदाटी केली नसल्याचे तसेच गट नं. ३८५ मध्ये पीक नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

७. वादी व प्रतिवादी तर्फे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. दावा, मनाई अर्ज व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. त्यावरुन खालील प्रमाणे चर्चा करीत आहेः–

८. वादीने त्याच्या अर्जामध्ये प्रतिवादी वाद मिळकत गट नं. ३८८ मध्ये वादीचे शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करुन, अतिक्रमण करत असल्याचे व ऊसाचे पीक काढण्यास अडथळा करत असल्याचे कथन केले आहे. याउलट प्रतिवादीने देखील प्रतिदाव्यासोबत मनाईचा अर्ज दाखल केला असून त्यांनी देखील वादी त्यांचे गट नं. ३८५ मध्ये हरकत अडथळा व ऊसाचे पीक काढण्यास अडथळा करत असल्याचे सांगून दोघांनी एकमेकांविरुध्द मनाईची मागणी केली आहे.

९. दोघांनीही त्यांच्या मनाई अर्जाच्या पृष्ठ्यर्थ मनाईची मागणी मंजूर होण्यासाठी योग्य ती कागदपत्रे जोडली आहेत का ते पाहणे गरजेचे आहे. वादीने त्याच्या मनाईच्या मागणीसाठी अभिलेखावर ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्यावरुन प्रथमदर्शनी गट नं. ३८८ ची मालकी औदूंबर मोरे म्हणजेच वादी याची दिसून येत आहे. वादीने वैराग पोलीस स्टेशन येथे दिनांक २४/०६/२०२० रोजी म्हणजेच दावा दाखल करण्यापूर्वी गट नं. ३८८ मध्ये प्रतिवादी विरुध्द हरकत अडथळा व मारहाण केले

बाबतच्या तक्रारीची प्रत दाखल केली आहे. तसेच, वैराग पोलीसांनी कारवाई न केल्याबाबतची माहिती, माहितीच्या अधिकाराखाली मागितलेले अर्ज दाखल केले आहेत. त्यानंतर प्रतिवादींना पोलीसांनी दिलेल्या ताकीदीची नोटीस दाखल केलेली आहे. तसेच, प्रतिवादींना पाठविलेल्या नोटीशीची प्रत देखील दाखल केली आहे. वरिल कागदपत्रांवरुन वादींनी प्रतिवादींकडून होत असलेल्या हरकत अडथळ्या बाबतचा त्रास व त्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या ठीकाणी केलेल्या तक्रारी याबाबतचा प्राथमिक स्वरुपाचा पुरावा दिसून येत आहे.

१०. प्रतिवादींनी केवळ वादींविरुध्द अडथळा करीत असल्याबाबतची तोंडी मागणी केली आहे. तसेच त्यांनी वादीस दिलेली नोटीस व त्यास आलेली उत्तरी नोटीस व नकाशा दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादीच्या तोंडी कथनांवरुन व दाखल कागदपत्रांवरुन वादीने प्रतिवादींच्या मिळकतीमध्ये हरकत अडथळा करुन पीक काढण्यास अडथळा केला असे म्हणता येणार नाही. याउलट वादीने दाखल केलेल्या प्राथमीक स्वरुपाचा पुरावा व कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, प्रतिवादीने वादीच्या ताब्यास व ऊसाचे पीक काढण्यास हरकत अडथळा केलेला आहे. ज्यामुळे त्याने वैराग पोलीस स्टेशनला प्रतिवादींविरुध्द तक्रार दिलेली होती. तसेच, प्रतिवादीचा त्रास होऊ नये याकरिता वेगवेगळ्या ठीकाणी प्रतिवादींवर कारवाई करण्यासाठी व मदत मागण्यासाठी धाव घेतल्याचे दिसून येत आहे. जर का प्रतिवादींना वादीचा त्रास होत असता तर त्यांनी वादीविरुध्द कारवाईची मागणी केल्याचे दिसून आले असते परंतु, तसे झालेले दिसून येत नाही. दाखल केलेल्या नकाशावरुन प्रतिवादीचा गट नं. ३८५ ही वादमिळकत गट नं. ३८८ च्या लगत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वादीने केलेली मनाईची मागणी मंजूर होण्यास पात्र आहे. तसेच, प्रतिवादीचा मनाईचा अर्ज प्रथामिक स्वरुपाच्या पुराव्या अभावी नामंजूर होण्यास पात्र आहे.

## आदेश

१. वादीचा निशाणी ५ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी स्वतः अगर इतरांमार्फत दावा मिळकतीतील वादीचे शांततामय कब्जे वहीवाटीस हरकत अडथळा करु नये, दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करु नये. तसेच, वादीचा कब्जा जाईल असे

कोणतेही कृत्य करु नये अशी प्रतिवादींना दावा निकाली होईपावेतो तुर्तातुर्त ताकीत देण्यात येत आहे.

३. प्रतिवादीचा निशाणी १९ वरील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे

(खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आले)

Digitally signed by JAVEED ABUBAKAR ZARI
Date: 2022.02.09 16:58:11 +0530

बार्शी. (जे.ए. झारी)

दिनांकः– ०८/०२/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.

## **C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | B.B.Salvade |
| (b) | Court | : | J.A.Zari,<br>Jt.C.J.J.D.&J.M.F.C.<br>Barshi. |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 08/02/2022 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 09/02/2022 |